Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near e-Balbharti, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं. १७८,१७९,
ई बालभारती शेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४



Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807 |
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्त्वाचे / तातडीचे

क्र.रा.मं./परीक्षा-७/२०८५
पुणे ४११ ००४.
दिनांक- १५/०५/२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :- फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव गुण प्रस्तावाबाबत

संदर्भ:- या कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा–७/१९८० दिनांक ११/०५/२०२६ चे पत्र

उपरोक्त विषयाबाबत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या परीक्षेस प्रविष्ट खेळाडू विद्यार्थ्यांनी/शाळांनी/कनिष्ठ महाविद्यालयांनी विहीत मुदतीत क्रीडा प्रस्ताव आपले सरकार पोर्टलवर तसेच संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर केलेले होते.

तथापि, त्यातील तांत्रिक कारणास्तव व त्रुटी अभावी प्रस्ताव विभागीय मंडळाकडे विहीत मुदतीत प्राप्त झाले नसल्याने अशा खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण देण्यात आलेले नाहीत. अशा प्रस्तावासंदर्भात जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून निश्चितीकरण करुन घ्यावे व त्यांनतर विभागीय मंडळ स्तरावर अशा प्रस्तावांची खातरजमा करुन जे विद्यार्थी गुण मिळण्यास पात्र आहेत अशा खेळाडू विद्यार्थ्यांना नियमानुसार क्रीडा सवलतीचे गुण देण्याबाबतची उचित कार्यवाही करावी असे संदर्भिय पत्रानुसार कळविले आहे.

तरी सदर प्रलंबित प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून दिनांक २०/०५/२०२६ अखेर पर्यत स्विकारावेत व त्याची छाननी करुन त्याबाबतच्या दुरुस्त्या गणकयंत्र विभागास दिनांक २२/०५/२०२६ पर्यंत सादर कराव्यात.

(मा.अध्यक्ष, राज्य मंडळ यांच्या मान्यतेने)

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्यमंडळ, पुणे–०४.

**क्र.कोविमं/१२ वी/परीक्षा/ 1746**
**दिनांक :- /०५/२०२६**
18 MAY 2026

**प्रति,**
**मुख्याध्यापक / प्राचार्य,**
**सर्व मान्यताप्राप्त शाळा / क. महाविद्यालये,**
**जिल्हा क्रीडा अधिकारी,**
**जिल्हा- सातारा,सांगली,कोल्हापूर.**

**विषय - फेब्रुवारी - मार्च २०२६ च्या इ.१० वी व इ.१२ वी परीक्षेस प्रविष्ठ खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव गुण प्रस्तावाबाबत.**

**उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षा फेब्रु-मार्च २०२६ करिता वरील पत्राप्रमाणे उचित कार्यवाही करावी.**

**(अनुराधा म्हेत्रे)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**